अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सर्वाधिक सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसला विरोधी पक्षनेते पदही नाही

भारतीय लोकशाहीच्या इतिहासामध्ये २०१४ हे वर्ष अनेक नव्या घटकांची नोंद करणारे ठरेल. प्रामुख्याने देशाच्या राजकीय इतिहासाबाबत २०१४ मधल्या घटना महत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण मानाव्या लागतील. ज्याप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीमध्ये प्रमुख विरोधी पक्षाला पूर्ण बहुमत मिळण्याची घटना घडली किंवा काँग्रेसशिवाय आतापर्यंत कोणताच राजकीय पक्ष लोकसभेत पूर्ण बहुमत मिळवू शकला नव्हता. तो मान २०१४ या वर्षाने भारतीय जनता पार्टी या राजकीय पक्षाला दिला. एकीकडे हा मान भाजपाला मिळत असताना त्याच वेळी स्वातंत्र्यानंतर सलग सत्ता भोगणाऱ्या आणि देशातल्या सर्वांत जुन्या म्हणजेच सव्वाशे वर्ष झालेल्या काँग्रेसपक्षाला केवळ ४४ जागांवर समाधान मानावे लागले आणि सर्वांत मोठी नामश्की पत्करावी लागली. आता तर एवढ्या मोठ्या जुन्या राजकीय पक्षाला लोकसभेसारख्या सार्वभौम सभागृहामध्ये विरोधी पक्षनेते पदही मिळू शकत नाही अशी परिस्थिती आहे. किंबहुना भारतीय लोकशाहीमध्ये असा ऐतिहासिक आणि अभूतपूर्व प्रकार पहिल्यांदाच घडतो आहे. सर्वाधिक काळ सत्तेवर राहिलेल्या आणि सर्वाधिक जुन्या पक्षाला विरोधी पक्षनेते पदापासून वंचित राहण्याची दुर्दैवी वेळ आलेली आहे. म्हणजे सत्तातरांचा अनोखा प्रकार २०१४ या वर्षांत ठरला. ज्या भारतीय जनता पार्टीला असे स्वप्नातदेखील वाटले नव्हते की, आपल्याला पूर्ण बहुमत किंवा तब्बल २८१ जागांवर विजय मिळेल आणि काँग्रेसलादेखील आपण ४४ जागाच मिळवू अशी शंका देखील आली नव्हती.

### काँग्रेसवर नामुश्कीची वेळ

२०१४ या वर्षातला हा नवा राजकीय इतिहास लिहिला जात आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षाइतकेच विरोधी पक्षालाही महत्त्व असते. विरोधी पक्ष जितका भक्कम आणि ताकदवान असेल तितकी लोकशाही व्यवस्था टिकाऊ होत जाते. कारण बहुमताच्या जोरावर सत्ताधारी पक्ष वाटेल ते निर्णय घेण्याचे प्रयत्न करतो. अशा वेळी त्याला रोखण्याचे काम संसद किंवा विधीमंडळातले भक्कम विरोधी पक्ष करतात. याच व्यवस्थेनुसार आणि आतापर्यंतच्या परंपरेप्रमाणे लोकसभेत ज्या विरोधी पक्षाने लोकसभेच्या एकूण जागांपैकी १० टक्के जागा जिंकल्या असतील त्या पक्षाला विरोधी पक्ष पद दिले जाते. परंतु आज लोकसभेमध्ये कोणत्याही विरोधी पक्षाला १० टक्के जागा मिळालेल्या नाहीत. काँग्रेसकडे हे संख्याबळ नसल्यामुळे लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन यांनी काँग्रेसला विरोधी पक्ष नेते पद देता येत नाही, असे जाहीर केले आहे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी महाजन यांना पत्र पाठवून त्यांच्या पक्षाचे मल्लिकार्जुन खरगे यांना विरोधी पक्ष नेते पद देण्याची मागणी केली होती. परंतु ती फेटाळली गेली आणि आज काँग्रेससारख्या अनेक वर्ष सत्ता गाजवलेल्या पक्षाला विरोधी पक्ष नेते पदही प्राप्त करता आले नाही, ही या पक्षाच्या दृष्टीने अपमानजनक गोष्ट ठरते. लोकशाहीमध्ये संख्याबळाला महत्त्व आहे. ज्याच्याकडे सर्वाधिक संख्या असते त्या पक्षाचा नेता पंतप्रधान होतो आणि आता जर विरोधी पक्ष नेते पदासाठी हेच संख्या बळ कमी पडत असल्याने काँग्रेसला या पदापासून वंचित राहावे लागले आहे. म्हणून हे वर्ष राजकीय इतिहासाच्या दृष्टीने एक वेगळी नोंद करणारे ठरते.

### १४ वे रत्न

याशिवाय याचवर्षांमध्ये काही राजकीय पक्षांना अनपेक्षित यश आणि पराभव पत्कारावे लागले. महाराष्ट्रात शिवसेनेला तर आंध्रप्रदेशात तेलगू देसम पक्षाला अनपेक्षित यश मिळाले. तसेच महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ दोन जागांवर आपला गाशा गुंडाळावा लागला. एवढेच नव्हे तर काश्मिरमध्येसुद्धा राजेशाही थाटामध्ये पिढ्यान्‌पिढ्या सत्ता उपभोगणाऱ्या फारुख अब्दुल्ला आणि त्यांच्या पक्षाला पराभवाची धूळ चाखावी लागली. या इतर घटनासुध्दा अन्य राजकीय पक्षाच्या कायम लक्षात राहणाऱ्या ठरतील. थोड्या वेगळया अंगाने २०१४ साल आंध्रप्रदेशसाठी ऐतिहासिक ठरले आणि नवीन तेलंगणा राज्याची निर्मिती झाली. तिथे नव्याने स्थापन झालेल्या तेलंगण पार्टीला असेच अभूतपूर्व यश मिळाले. अशा सगळ्या घटनांची गोळा बेरीज केली तर २०१४ हे वर्ष राजकीय कलाटणी देणारे म्हणावे लागेल. या वर्षाने काही राजकीय पक्षांना १४वे रत्न दाखविले तरी काहीना 'सत्तेचा रत्नहार' बहाल केला.

### हा पळपुटेपणा कशासाठी

खरे तर सध्या काँग्रेसने आपली परिस्थिती सुधारण्यासाठी काळजीपूर्वक पावले उचलली पाहिजेत. सरकार चालविताना किंवा सत्ता आपल्या ताब्यात राहावी यासाठी अनेक मित्र पक्ष काँग्रेसने गोळा केले होते. यातून संयुक्त पुरोगामी आघाडी म्हणजे यूपीए तयार झाले होते. या मित्र पक्षांच्या पाठिंब्यामुळे काँग्रेसला आपले संख्याबळ वाढविता आले. आणि पंतप्रधानपदही मिळविता आले. आतादेखील त्याच यूपीएचा प्रयोग विरोधी पक्षांची आघाडी स्थापन करण्यासाठी येऊ शकतो. सर्व विरोधी पक्षांची आघाडी करून सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून एकूण संख्याबळाच्या जोरावर नेतेपदही मिळविता येऊ शकेल. सत्ता स्थापन करण्यासाठी तर आघाडी होऊ शकते. तर मग सत्ताधारी पक्षाला विरोध करण्यासाठी तशी आघाडी का होऊ नये. सत्ताधारी पक्षाला या सर्व पक्षांच्या विरोधाशी संघर्ष करावा लागेल. लोकशाहीसाठी त्याची गरज आहे. अशा नव्या कल्पनेसाठी काँग्रेसने पुढाकार घ्यायला काहीच हरकत नाही. एक तर केवळ ४४ जागांवर पक्षाला आपले बळ टिकवावे लागेल आणि जर ते वाढवायचे असेल तर सत्ताधारी पक्षाशी राजकीय डावपेच आखूनच लढावे लागेल. आपल्या लोकप्रियतेला किंवा प्रतिष्ठेला धक्का लागेल असे वागून चालणार नाही. ज्या पक्षाला लोकसभेत विरोधी पक्षनेते पदही टिकवता आले नाही. त्या पक्षाच्या नेत्यांनी किंवा मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांच्या कार्यक्रमांवर बहिष्कार टाकावा त्याच्याइतकी हास्यास्पद गोष्ट नाही. हरियाणाचे मुख्यमंत्री हुड्डा यांनी सर्वप्रथम हा प्रकार केला. त्यापाठोपाठ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी नरेंद्र मोदींच्या नागपूर येथल्या कार्यक्रमाला हजर न राहण्याची घोषणा केली. कदाचित मुंबई आणि सोलापूरमधल्या कार्यक्रमात चव्हाण यांच्या भाषणाच्या वेळी व्यत्यय आणण्याचा प्रयत्न काही उत्साही भाजपा कार्यकर्त्यांनी केल्याने ते नाराजही झाले असतील. परंतु थेट सत्ताधारी पक्षाच्या व्यासपीठावर उपस्थित राहून आपले म्हणणे मांडण्याऐवजी हा बहिष्काराचा पळपुटेपणा कशासाठी असा प्रश्न निर्माण होतो.

यापुढे प्रसारमाध्यमांमध्ये मुख्यमंत्र्यांच्या बहिष्कारावर टीका-टिपणी होईल. भाजपा नेत्यांच्या हातात कोलीत दिल्यासारखे होईल. त्यापेक्षा मोदींच्या मांडीला मांडी लावून महाराष्ट्राच्या प्रगतीची, विकासाची जाहीरपणे मांडणी झाली तर त्याचा चव्हाण आणि काँग्रेस पक्षाला जास्त फायदा होईल. इथे राजकीय डावपेचच हवेत. केवळ भाजपा नेते महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन उद्‌घाटने किंवा पायाभरणीची कामे करीत आहेत आणि त्यात मुख्यमंत्र्यांना अडचणीचे वाटायला लागते. अशी कारणे सांगून पळून जाणे योग्य नाही. शेवटी भाजपा जर राजकीय खेळी करीत असेल तर काँग्रेसच्या नेत्यांना किंवा मुख्यमंत्र्यांना राजकीय आखाड्यात लढावे लागेल. अन्यथा लढाईपूर्वीच हार पत्करण्यासारखे ठरेल. आधीच पक्षाची वाईट परिस्थिती असताना बहिष्कारासारखे निर्णय घेऊन पक्षाने आपली शोकांतिका करून घेऊ नये. अन्यथा २०१४ सालात काँग्रेसने केलेला पळपुटेणाही याचवर्षी नोंदला जाईल.